माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**रामाआ - तक्रार क्र. अम- २१३/२०२४**

तक्रारकर्ता श्री.दिनाजी शामराव ढोले.
**मु.पाळुवाडी, पो.हर्षी, ता.पुसद, जि.यवतमाळ.**
**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, पुसद, ता.पुसद, जि.यवतमाळ.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, पुसद, ता.पुसद, जि.यवतमाळ.

**तक्रार सुनावणी दिनांक - २७.०३.२०२६.**

**तक्रारकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| जोडपत्र-अ चा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २१.०४.२०२३ | २८.०४.२०२३ | ०५.०४.२०२४ |

तक्रारकर्ता यांनी दि.०५.०४.२०२४ रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ (१)(ग) अन्वये तक्रार दाखल करुन, दि.२१.०४.२०२३ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसाच्या विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही तसेच माहिती देखील पुरविली नाही, असे कारण नमुद केले आहे.

प्रस्तुत तक्रारीवर आज दि.२७.०३.२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.वैभव खाडे नायब तहसिलदार उपस्थित आहेत.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती विभाग

अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.०४.२०२३ रोजी रितसर माहितीचा अर्ज दाखल करुन, *"दि. ०६.०१.२०२३ रोजी तहसिलदार पुसद यांचेकडे निस्तारहक्क (मुरुम उचल) बजावण्याबाबत दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची"* माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसाच्या विहीत मुदतीत माहितीचे प्रदान न झाल्याने तक्रारकर्त्याने आयोगाकडे थेट तक्रार दाखल केल्याचे दिसून येते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या खुलाश्यावरुन असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार श्री.दिनाजी ढोले यांनी प्रस्तुत तक्रार अर्ज दाखल केला असून, यात जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी मौजा पाळूवाडी येथील निस्तार पत्राकामधील कार्यवाही केली नसल्याने नमूद केलेले आहे. सेवानिवृत्त सनदी अधिकारी माजी राज्य माहिती आयुक्त आदरणीय श्री.संभाजीराव सरकुंडे यांनी या प्रकरणी या पुर्वी झालेल्या सुनावणीत व्यक्तीश: हजर राहुन युक्तीवाद देखील केला होता तसेच हा जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असून निस्तार हक्का संबंधीत ग्रामसभेतून ठराव पारित करण्यात आल्यानंतरही तहसिलदार, पूसद यांनी त्यावर कुठलीही कार्यवाही केली नसल्याने विविध नियम व कायद्यातील तरतुदीनूसार त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्याची आग्रही मागणी देखील करण्यात आली होती.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम १६१ व १६२ नूसार तहसिलदार पूसद यांनी आयोगाचे आदेशापासून आगामी तीन महिन्याच्या आत अर्जदारांच्या निवेदनांवर व ग्रामसभेच्या ठरावावर चौकशी करुन ग्रामस्थांच्या निस्तार हक्कावर जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडून मंजुरी मिळण्याची कार्यवाही करावी व मंजुर निस्तार हक्काची अधिसूचना जारी करण्याचे आदेश पारित करण्यात यावे, अशी ही मागणी करण्यात आली होती.

वरील मागणीतील जनहित लक्षात घेता, जर अशा प्रकारचे निर्देश देणे हे आयोगाच्या कार्यकक्षेबाहेर वस्तुस्थिती असली तरी महाराष्ट्र शासनाच्या तत्कालीन मा.मुख्य सचिव यांचे दि. १८.०१.२०१३ रोजीच्या परिपत्रकानूसार शासनाकडे प्राप्त निवेदनावर १२ आठवड्यांच्या आत कार्यवाही करण्याबाबत जारी केलेले दिशानिर्देश तसेच राज्य सरकारने नुकतेच जारी केलेल सेवा हमी हक्काबाबतचे निर्देश इत्यादी बाबी लक्षात घेता, मागील सुनावणीत या प्रकरणी प्रशासकीय पातळीवर कार्यवाही करण्याच्या मौखीक सूचना प्राधिकरणास देण्यात आल्या होत्या. त्या प्रमाणे दि. ०६.०५.२०२४ रोजीच तहसिलदार पूसद यांनी एक सविस्तर निवेदन

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ सत्यमेव जयते

दाखल केले असून, त्यात दि. १७.०४.२०२३ रोजी निस्तार पत्रकासंदर्भातील प्रस्ताव हा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे सादर करण्यात आला होता व त्यांचेकडून सदर निस्तार पत्रक मंजुर होवून दि. १९.०७.२०२३ रोजी तहसिलदार, पूसद यांचे कार्यालकयाकडे प्रसिध्दीकरीता प्राप्त झाला असून, याबाबत पूढील कार्यवाही निर्णयानूसार करण्याबाबत लवकरात लवकर प्रयत्न करण्यात येतील, असे नमूद केले. तसेच तक्रारकर्ता श्री. ढोले यांचे जोडपत्र-अ च्या अनुषंगाने देखील त्यांना याआधिच माहिती देण्यात आली असल्याचे त्यांनी कळविले आहे. विशेषत: दि. १७.०४.२०२३ व १९.०१.२०२४ रोजीच्या पत्रांची प्रत देखील यात सादर करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणी अपिलकर्ता यांना अपेक्षीत असलेली कार्यवाही ही प्रशासकीय पातळीवर तहसिलदार, पूसद व जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचेस्तरावर झाली असल्याचे तसेच जोडपत्र-अ च्या अनुषंगाने कार्यालीयन अभिलेखात कलम २(च) प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती त्यात अपेक्षीत कार्यवाहीसह झाली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती

**(राहूल भा.पांडे)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २७.०३.२०२६**

जावक क्रमांक 3238 दिनांक 30 APR 2026